दिनांक २०/०८/२०१८

:: प्रेस नोट ::

**शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथील प्रमुख लिपिक (रोखपाल) श्री शेख गनी हुसेन यांना ५००/–रु लाच स्विकारतांना ला.प्र.विभागाने रंगेहात पकडले**

---

यातील तकारदार हे वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी आहेत. त्यांचे आंतरवासियता (इनटर्नशिप) प्रशिक्षण सुरु आहे. तकारदार यांच्या सोबतच्या एका मित्राने इनटर्नशिप प्रशिक्षण चे कॉलेज नाशिक आरोग्य विद्यापीठाकडे विनंती करुन नांदेड ते नागपूर असे बदलून घेतले आहे. इनटर्नशिप कालावधीत त्यांना विद्यावेतन (स्टायपन्ड) मिळते.

विद्यावेतन वाटप नोंदवही मध्ये तकारदार यांचा मित्राचे नावासमोर मित्राची सही असलेले रशीद तिकीट लावु देण्यासाठी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथील कॅशीअर श्री शेख गणी हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत तकार दिनांक १०/०८/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयात नोंदविली होती.

तकारीचे अनुषंगाने लाचलुचत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन पंचासमक्ष दिनांक १३/०८/२०१८ रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथील कॅशीअर श्री शेख गणी यांनी तकारदार यांना नमुद कामासाठी ५००/–रु. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पंचासमक्ष दिनांक २०/०८/२०१८ रोजी आयोजित केलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथे कॅशीअर श्री शेख गणी यांना तकारदार यांचेकडुन ५००/–रु. लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले असुन श्री शेख गणी हुसेन वय ५६ वर्षे, प्रमुख लिपिक (रोखपाल), नेमणूक कार्यालय अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड रा. राहूलनगर, परभणी यांचेविरुध्द पोलीस स्टेशन वजिराबाद, नांदेड येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे.

तरी सर्व नागरीकांना विनंती की, शासकिय लोकसेवकाने त्यांचे प्रलबिंत असलेले शासकिय काम करण्यासाठी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास व भ्रष्टाचार संबधाने काही माहीती असल्यास तसेच एखाद्या लोकसेवकाने असपंपदा संपादित केली असल्याची माहीती असल्यास खालील कमांकावर संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| कार्यालय अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड | ०२४६२–२५३५१२ |
| पोलीस उप अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड | ८५५४८५२९९९ |
| हेल्पलाईन टोल फ्री कमांक | १०६४ |
| Website www.acbmaharashtra.gov.in | Mobile app acbmaharashtra.net |
| Face book page www.facebook.com/maharashtraacb | |

कार्यालय पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.नांदेड युनिट

( संजय कुलकर्णी )
पोलीस उप अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड करीता

प्रति,

संपादक दैनिक ..............................